# प्रेस नोट

सहा.पोलीस आयुक्त,मासंवि,
पोलीस मुख्यालय,पुणे शहर यांचे
कार्यालय दिनांक :- ०६/१०/२०१७.

**विषय:-** हृदय बंद पडल्यास द्यावयाची प्रथोमपचार सेवा प्रशिक्षण देण्यात आलेबाबत

याद्वारे आपणास कळविणेत येते की, पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत आज दि.०६/१०/२०१७ रोजी पोलीस मुख्यालय, शिवाजीनगर,पुणे येथे सकाळी ०९/०० ते ११/०० वा.चे दरम्यान हृदय बंद पडल्यास द्यावयाची प्रथोमपचार सेवा प्रशिक्षण देण्यात आले. प्रमूख पाहूणे म्हणून पुणे शहराचे खासदार मा.श्री.अनिल शिरोळे, पुण्याचे महापौर श्रीमती मुक्ता टिळक यांचे उपस्थित मा.पोलीस सह आयुक्त श्री. रविंद्र कदम, मा.अपर पोलीस आयुक्त श्री. साहेबराव पाटील हे हजर होते. सदर प्रशिक्षणामध्ये तातडीचे वेळी हृदय क्रिया बंद पडल्यास कोणती काळजी घेतली पाहिजे, कोणते प्रथमोपचार केले पाहिजेत या विषयावर लार्डेल मेडिकल या नार्वे स्थित संस्थेचे वतीने तज्ञ डॉक्टर प्रात्यक्षिकांसह कार्यक्रमास हजर पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण दिले . या कार्यक्रमाची संकल्पना कोहेसीव लॅब्जच्या पुष्कर इंगळे, आनंद आपटे व अमोद घळसासी यांनी मांडली होती .सदरचे प्रशिक्षण कार्यक्रम लार्डेल मेडिकल या नार्वे स्थित संस्थेतर्फे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी लारडेल मेडिकलतर्फे २०० मॅनिकिन्स (डमी बाहूल्या) चे द्वारा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ६०० पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार मा.श्री. शेषराव सुर्यवंशी, पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय पुणे शहर यांनी केले .

दि:०६/१०/










Helping Save Lives – Together with Pune Police
CPR training program
6th – 7th October 2017
Laerdal







